## नि. ०९ खालील आदेश
( दि. ०१/०४/२०२४ )

अर्जदार हिने प्रस्तुत अर्ज वि.प. १ कडून अंतरिम पोटगी मिळण्याकरीता केलेला आहे. तिचे कथन थोडक्यात असे आहे की, तिचे लग्न वि.प.क्र. १ सोबत दि. २२/११/२०२० रोजी बौध्द धर्मशास्त्राप्रमाणे झालेला आहे. वि.प. यांनी अर्जदार व त्यांची मुलगी स्पृहा हिचा त्याग केलेला आहे. त्यासाठी सदर कौटुंबिक छळाचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार व त्यांची मुलगी सध्या त्यांचे माहेरी अर्जदाराचे वडीलांचे घरी मनोज नामदेव कदम यांचेकडे आश्रयाला येवुन रहात आहेत. वि.प.क्र. १ हे स्वतः पनवेल या ठिकाणी अक्वागार्ड या ठिकाणी नोकरीस असुन वि.प.क्र. १ यांना दरमहा र.रु. ३५,०००/- इतका पगार आहे. तसेच वि.प.क्र. १ यांचेवर इतर कोणीही अवलंबुन नाही व वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांना घराबाहेर हाकलुन दिल्यानंतर त्यांची कोणतीही उदरनिर्वाहाची सोय केलेली नाही, व कायदेशीर जबाबदारी पार पाडली नाही व त्या बाबींमध्ये हलगर्जीपणा केलेला आहे.

२. तसेच अर्जदार यांचे वडील हे बिगारी काम करत असता अर्जदार यांचा त्याग केल्यामुळे व त्यांच्या वडीलांच्या घरातील परिस्थिती अत्यंत नाजुक व हलाखीची आहे. अर्जदार व त्यांचे मुलीचा सांभाळ करण्याची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांचे वडीलांवर आली असल्यामुळे त्यांचा खर्च प्रचंड प्रमाणावर वाढला असून त्यांना जास्त स्वरुपात मजुरी करावी लागत आहे. अर्जदार यांना उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. सदर अर्जास निकाल होण्यास बराच कालावधी लागणार असुन अर्जदार यांना दिड वर्षांची मुलगी असुन त्यांना उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. न्यायालयात येण्या-जाण्यासाठी तसेच न्यायालयीन कामासाठी त्यांना या न्यायालयात उपस्थित रहाण्यासाठी प्रत्येक तारखेस यावे लागणार आहे. तसेच त्या महिला असुन त्यांच्यासोबत घरातील एका व्यक्तीस न्यायालयात यावे लागणार आहे. अर्जदार यांचे आजारपण, त्यांचा दवाखाना त्यांना लागणारे कपडे, त्यांना लागणारा वेळ, हया कोणत्याही गोष्टी वि.प.क्र. १ यांनी पती या नात्याने पार पाडलेल्या नाहीत व प्रत्येक वेळी भांडण काढुन टाळाटाळ केलेली आहे. अर्जदार व त्यांच्या वडीलांनीच अर्जदाराचा आत्तापर्यंत सर्व सांभाळ व खर्च केलेला आहे. तसेच अर्जदार हया त्यांचे वडीलांकडे रहात असुन त्यांना खर्चाची कोणतीही बाब वि.प.क्र. १ यांनी उपलब्ध

करुन दिलेली नाही. तसेच त्या कोठेही कामास नाहीत, व त्यांना उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. या सर्व बाबींचा विचार करुन या न्यायालयाने अर्जदार यांचा सदरचा अर्ज मंजुर करुन त्यांना मध्यंतरी पोटगी म्हणुन र.रु. १५,०००/- सदर अर्ज दाखल तारखेपासुन मंजुर करण्यात यावी अशी विनंती अर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी केलेली आहे.

३. वि.प.क्र. १ यांनी सदर अर्जास समान खुलासा नि. २५ अन्वये दाखल केला. अर्जदार व वि.प.क्र. १ यांच्यात दि. २२/११/२०२० रोजी त्यांच्या रितीनुसार विवाह पार पडला हा परिच्छेद क्र. १ मधील मजकुर अंशतः बरोबर असल्याचे कथन केले. परंतू, वि.प.क्र. १ ने अर्जदाराचा त्याग केला हा खोटा आणि निराधार आरोप आहे. वि.प.क्र. १ ने अर्जदार व त्यांचे मुलीला परत आणण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. अर्जदार हिने लग्नाच्या सुरवातीच्या दिवसापासुन वि.प. यांचेसोबत शुल्लक मुद्दयांवर त्यांना न सांगता घर सोडले आहे. तसेच वि.प. यांना त्रास देण्यासाठी अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. परिच्छेद क्र. २ मधील मजकुर खोटा व बनावट आहे. कारण अर्जदाराने पुन्हा आपल्या बहिणीच्या मुलाचा वाढदिवस साजरा करुन लवकरच परत येईल या बहाण्याने तिचे वैवाहिक घर सोडले आणि ती पुणे येथे तिच्या नावावर असलेली मालमत्ता देखील हस्तांतरीत करणार आहे. अर्जदार हिने एक महिना झाला तरी परत फोन केला नाही. वि.प.क्र. १ तिला परत येण्यास सांगत होता. परंतू, तिने कधीही त्याला उत्तर दिले नाही. कारण अर्जदार हिने वि.प. ला बनावट घरगुती हिंसाचार प्रकरणात अडकविण्याचे उद्देशाने तिचे वैवाहिक घर सोडले होते आणि यावेळी ती यशस्वी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, वि.प.क्र. १ हा र.रु. ३५,०००/- कमावित असुन तो श्री. गणेश एंटरप्रायझेस येथे तंत्रज्ञ म्हणुन कामास आहे व त्यातुन त्याला र.रु. १५,९५०/- दरमहा मिळत आहेत. वि.प.क्र. १ ने त्याचे मालमत्ता पत्रकासोबत त्याचे पगारपत्र जोडले आहे. सदरची बाब अर्जदार हिच्या माहितीतील होती, कारण ती वि.प.क्र. १ ची पत्नी आहे. घरगुती हिंसचार कायदा २००५ अंतर्गत आपल्या पतीच्या उत्पन्नाची योग्य माहिती ठेवणे प्रत्येक पत्नीचे कर्तव्य आहे.

४. परिच्छेद क्र. ३ मधील संपुर्ण मजकुर खोटा व बनावट आहे. अर्जदार हिने दौंड, पुणे येथे तिचे वडीलांचे स्वतःचे इलेक्ट्रॉनीकचे दुकान असल्याचे नमुद केले नाही.

अर्जदार राहत असलेले घर हे त्यांचे वडीलोपार्जित घर आहे. ज्यामध्ये ५ बेडरुम, एक संयुक्त स्वयंपाक घर आणि वेगळे शौचालय आहे. जिथे अर्जदार हिचे दोन काका देखील त्यांच्या मुलांसह संयुक्तपणे राहत आहेत. अर्जदार हि वि.प.क्र. १ पेक्षा जास्त म्हणजेच दौंड येथील कॉलेजमधुन १२ वी पर्यंत शिकलेली आहे. तिने लग्नापुर्वी पोलीस भरतीची परीक्षा देखील दिली होती, आणि अर्जदार ही हुशार असल्याने अत्यंत हुशारीने तिने मा. न्यायालयापासुन सत्य लपविले आहे. अर्जदार ही दौंड येथील एका नामांकित कंपनीत कार्यरत आहे. तिला र.रु. १०,०००/- उत्पन्न त्यातुन मिळते. रजनिश विरुध्द नेहा प्रकरणी मा. नामदार सर्वोच्च न्यायालयाने दिलेला स्पष्ट निकाल असुन घरगुती हिंसाचाराच्या खटल्यातील दोन्ही पक्षांनी त्यांचे उत्पन्न उघड करणे बंधनकारक आहे. ही सर्व तथ्ये मा. न्यायालयापासुन लपविलेली आहेत. कायदयाची भिती न बाळगता अर्जदार हिने अतिशय हुशारीने आणि महिला असल्याचा गैरफायदा घेवुन ही सर्व वस्तुस्थिती लपविली आहे व तिच्या मालमत्ता पत्रकामध्ये तिच्या मागील ३ वर्षांच्या बँक खात्याचा तपशिल सादर केलेला नाही की जो अनिवार्य आहे.

५. परिच्छेद क्र. ४ मधील संपुर्ण मजकुर खोटा व बनावट आहे. अर्जदार हि दौंड येथील एका नामांकित कंपनीत काम करुन र.रु. १०,०००/- स्वतः कमावित आहे. त्यामुळे अर्जदार हि तिचा खर्चच नाही तर तिचे मुलीचा खर्च देखील करण्यास सक्षम आहे. परिच्छेद क्र. ५ मधील संपुर्ण मजकुर खोटा व बनावट आहे. वि.प.क्र. १ यांनी नेहमीच जबाबदार पती व वडील असल्याने त्यांच्या सर्व कायदेशीर इच्छा पुर्ण केल्या. अर्जदाराप्रती असलेल्या त्यांच्या प्रेमाचे आणि काळजीचे उदाहरण म्हणजे वि.प.क्र. १ ने अर्जदारावर मनापासुन प्रेम असल्यामुळे त्याने त्यांना राहण्यासाठी भाडयाने फ्लॅट घेतला होता ज्यासाठी तो र.रु. ७,०००/- दरमहा भाडे देत होता. जो त्याने अर्जदाराच्या वडीलांच्या मागणीनुसार घेतला होता. तो त्याच्या क्षमतेच्या पलिकडे होता. कारण अर्जदार हिच्या वडीलांना अर्जदार हिला वि.प.क्र. १ व त्याचे घरचे राहत असलेल्या चाळीतल्या घरात पाठवायचे नव्हते. वि.प.क्र. १ नव्हे तर वि.प.क्र. १ चे संपुर्ण कुटुंब अर्जदार हिला त्यांचे मुलीप्रमाणे काळजी घेत होते. तसेच अर्जदार व तिच्या मुलीशी संबंधित सर्व उत्सव वि.प. यांनी मोठया उत्साहात साजरे केले आहेत. अर्जदार व तिचा बॉयफ्रेंड याच्यातील व्हॉटसअप चॅट व अर्जदार आणि तिच्या मुलीच्या वाढदिवसाचे फोटो सोबत दाखल केलेले आहेत.

६. परिच्छेद क्र. १ मधील मजकुर पुर्णपणे खोटा व बनावट आहे. कारण घरगुती हिंसचार, बदनामी, छळ, मानसिक यातना जे काही होते ते सर्व वि.प.क्र. १ व त्याचे कुटुंबियांना अर्जदार हिचे विवाहबाहय संबंधामुळे झालेल्या आहेत. अर्जदार हि तिच्या मित्रासोबत जेव्हा तिच्या खाजगी गोष्टी शेअर करत होती, त्यावेळी वि.प.क्र. १ ने त्यांना रंगेहात पकडले होते. अर्जदार हिने या सर्व गोष्टी ति-हाईत इसमास शेअर करणे व तिचे विवाहबाहय संबंध हे वि.प.क्र. १ ला पती म्हणुन असहय होते. तरी देखील वि.प.क्र. १ ने जबाबदार पती म्हणुन अर्जदार हिला धिरज सोबत असलेले सर्व संबंध तोडण्याची विनंती केली. तेव्हा पासुन अर्जदार हिने वि.प.क्र. १ व त्यांचे कुटुंबियांना धमकावण्यास सुरुवात केली व ती त्यांना त्यांच्या हुंडयाची खोटी केस दाखल करेल अशी धमकी देत असत. त्यामुळे वि.प.क्र. १ हा शांत होता. यावरुन हे स्पष्ट होते की, अर्जदार हिचा घरगुती हिंसाचार झालेला नाही. मा. मुंबई उच्च न्यायालयाने विजयानंद दत्ताराम नाईक विरुध्द विश्रांती विजयानंद नाईक या न्यायनिवाडयामध्ये असे निष्कर्षित केले आहे की, पत्नी म्हणजेच अर्जदाराला घरगुती हिंसाचाराच्या कोणत्याही कृत्याला सामोरे जावे लागले असेल तर न्यायालयास कायद्यानुसार कोणताही दिलासा देणे अनिवार्य आहे आणि असे कोणतेही कृत्य आढळले नसेल तर न्यायालयांना सदर कायदयाप्रमाणे कोणताही दिलासा अर्जदाराला देता येणार नाही.

७. वि.प.क्र. १ हा ९ वी पास आहे आणि श्री. गणेश एंटरप्रायझेस येथे तंत्रज्ञ म्हणुन काम करत आहे. त्यातुन त्याला र.रु. १५,९५०/- वेतन मिळते. त्याचे खर्च असे की, घरचे भाडे र.रु. ८,०००/- दरमहा, फ्लॅटची देखभाल र.रु. ३००/- दरमहा, वीज खर्च अंदाजे र.रु. १,५००/- दरमहा, ३ व्यक्तींकरीता किराणा सामानाचा खर्च र.रु. ३,५००/- दरमहा, वि.प.क्र. २ व ३ यांना हदयाचा त्रास असल्याने त्यांना वैद्यकीय खर्च म्हणुन र.रु. २,०००/- व औषधउपचाराच्या खर्चासाठी र.रु. २,०००/-, वि.प.क्र. १ यांचा घर ते ऑफीस प्रवास खर्च र.रु. २,०००/-, वि.प.क्र. २ चा घर ते ऑफीस प्रवास खर्च र.रु. १,५००/-, इतर विविध खर्च कपडे इ. र.रु. २,०००/- दरमहा, असा अंदाजे र.रु. ३०,०००/- मासिक आहे, वि.प.क्र. १ चा पगार वि.प.क्र. १, २ आणि ३ च्या खर्चासाठी पुरेसा नाही. वि.प.क्र. २ वयाच्या ५८ वर्षांपर्यंत सुरक्षा रक्षक म्हणुन खाजगी सोसायटीत र.रु. ७,०००/- दरमहा कमवित होते. त्यांचे पगारपत्रक सोबत जोडले आहे. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र नाही. तसेच अर्जदाराला कोणतेही उत्पन्नाचे

साधन नसल्याबाबत तीने कोणतेही बँक स्टेटमेंट किंवा बोनाफाईड न्यायालयात दाखल केलेले नाही. अर्जदाराने केलेली सर्व कथने ही बिनपुरावा केलेली आहेत. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती वि.प. तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी केलेली आहे.

८. न्यायपटलावरील अर्जदार व जाबदेणार यांचे कथन, दाखल कागदपत्रे तसेच दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे विचाराधीन घेण्यात आले असून त्या खाली दिलेल्या कारणांच्या आधारे त्यापूढे निष्कर्ष नोंदवीण्यात आलेला आहे.

| अ क्र | मुद्दे | निष्कर्श |
|---|---|---|
| ०१. | वि.प. क्र. १ यांनी अर्जदारावरती कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी अर्जदाराने सिध्द केले आहे काय? | होय. |
| ०२. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते काय ? असल्यास किती? | होय, अर्जदार यांना दरमहा ६,०००/- रु. मंजुर. |
| ०३. | आदेश काय? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र. १ करीता -

९. अर्जदार व वि.प.क्र. १ यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार व वि.प.क्र.१ यांचा विवाह दि. २२/११/२०२० रोजी झालेला आहे. वि.प. यांनी अर्जदार व त्यांची मुलगी स्पृहा हिचा त्याग केलेला आहे. त्यासाठी सदर कौटुंबिक छळाचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार व त्यांची मुलगी सध्या त्यांचे माहेरी अर्जदाराचे वडीलांचे घरी मनोज नामदेव कदम यांचेकडे आश्रयाला येवुन रहात आहेत. वि.प.क्र. १ हे स्वतः पनवेल या ठिकाणी अक्वागार्ड या ठिकाणी नोकरीस असुन वि.प.क्र. १ यांना दरमहा र.रु. ३५,०००/- इतका पगार आहे. तसेच वि.प.क्र. १ चा इतर कोणीही अवलंबुन नाही व वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांना घराबाहेर हाकलुन दिल्यानंतर त्यांची कोणतीही उदरनिर्वाहाची सोय केलेली

नाही व कायदेशीर जबाबदारी पार पाडली नाही व त्या बाबींमध्ये हलगर्जीपणा केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील कथने अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्रावर कथन केलेली आहेत. याउलट, वि.प. यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन अर्जदार यांची सर्व कथने नाकारलेली आहेत. परंतु, तसे करत असतांना वि.प. यांनी कोणतीही स्पष्ट बाजु मांडली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. वि.प. यांनी दिलेले म्हणणे हे मोघम स्वरुपाचे असल्याने व अर्जदार यांची सर्व कथने नाकारली असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे वि.प.क्र. १ यांनी त्यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१०. वि.प.क्र. १ यांनी त्यांच्या नि. २५ वरील म्हणण्यामध्ये कथन केल्याप्रमाणे त्यांनी अर्जदार यांना नांदण्यास परत आणण्याकरीता कोणते प्रयत्न केले याबाबत कोणताही पुरावा व अर्जदार हिने स्वतःहुन वि.प.क्र.१ यांचा त्याग करुन निघुन गेल्या ही बाब वि.प.क्र. १ ने प्रथमदर्शनी सिध्द केलेली नाही. याउलट अर्जदार यांनी कथन केल्याप्रमाणे वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांचे कोणतेही संयुक्तिक कारणाविना त्याग केला आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. यावरुन वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांची जबाबदारी नाकारल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. वि.प. यांनी त्यांचे म्हणण्यात कथन केल्याप्रमाणे अर्जदार व वि.प. यांचेदरम्यान कोणते वाद होते अथवा कसे अथवा अन्य बाबी या त्यांचे दरम्यान होणा-या अंतिम पुराव्याअंती ठरणा-या बाबी आहेत. परंतू, प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्रावर त्यांचा प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असुन वि.प.क्र. १ यांनी त्यांचा त्याग केला असल्याचे आणि अर्जदार व त्यांची मुलगी स्पृहा हिचे पालनपोषणाकरीता कोणतीही तजवीज केली नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार करता वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांचा कौटुंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असुन वि.प.क्र.१ यांनी कोणत्याही संयुक्तिक कारणाविना अर्जदाराचा त्याग केलेला आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. २ करीता</u> -

११. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात कथन केल्याप्रमाणे वि.प.क्र.१ यांची आर्थिक स्थिती चांगली असुन त्यांना दरमहा र.रु. ३५,०००/- उत्पन्न आहे. तसेच त्यांना इतर

प्रकराचे देखील उत्पन्न असल्याचे त्यांचे दाखल बँक स्टेटमेंटवरुन दिसुन येत आहे. वि.प.क्र. १ त्यांचेवर अन्य कोणाची जबाबदारी नाही. त्यामुळे वि.प.क्र.१ यांची आर्थिक स्थिती चांगल असुन त्यांच्याकडुन अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये १५,०००/- इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

१२. याउलट, वि.प.क्र.१ यांनी सदर अर्जदार यांची कथने नाकारुन वि.प.क्र.१ हे श्री. गणेश एंटरप्रायझेस येथे तंत्रज्ञ म्हणुन नियुक्त असुन त्यातुन त्यांना र.रु. १५,९५०/- दरमहा मिळत आहेत. वि.प.क्र.१ हे स्वतःचा व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. त्यांचेवर त्यांचे आई वडील यांची जबाबदारी असुन त्यांचा सर्व खर्च वि.प.क्र. १ करीत आहेत. तसेच त्यांच्यावर वि.प.क्र.२ व ३ यांचे उदरनिर्वाह व औषधोपचाराची देखील जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर व्हावा अशी विनंती वि.प. ने केलेली आहे.

१३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी अभिलेखावर वि.प.क्र.१ यांचे उत्पन्नाबाबत अथवा त्यांनी कथन केल्याप्रमाणे वि.प.क्र.१ यांचे आर्थिक स्थितीबाबत माहिती दर्शविणारे कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. याउलट वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांची सर्व कथने नाकारलेली आहेत. भारतीय पुरावा कायदा व प्रचलित कायदयातील तरतुदीनुसार जी बाब ज्याच्या माहितीमध्ये आहे त्याबाबतचा पुरावा सादर करण्याची जबाबदारी त्याच व्यक्तीवर आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांनी अभिलेखावर नि. ११ प्रमाणे त्यांचे मा.नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे रजनिश विरुध्द नेहा या न्यायनिवाडयामध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे त्यांचे उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांचे कोणतेही उत्पन्न नसुन त्यांच्या नावे कोणतीही जंगम व स्थावर मालमत्ता नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच वि.प.क्र.१ हे नोकरी करीत असुन त्यांना दरमहा रक्कम रुपये ३५,०००/- वेतन असल्याचे अर्जदार यांनी नमुद केलेले आहे.

१४. नि. १० वरील प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी त्यांची आर्थिक स्थितीची माहिती ही प्रतिज्ञापत्रावर न्यायालयात सादर केली आहे. याउलट वि.प.क्र.१ यांनी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वर नमुद न्यायनिवाडयात दिलेल्या

सुचनांप्रमाणे नि.१७ वर त्यांचे उत्पन्न व खर्चाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असुन त्याप्रमाणे ते श्री. गणेश एंटरप्रायझेस येथे तंत्रज्ञ म्हणुन नियुक्त असुन त्यातुन त्यांना र.रु. १५,९५०/- दरमहा मिळत आहेत असे कथन केले आहे. यावरुन वि.प.क्र.१ यांनी निव्वळ अर्जदार पोटगीची रक्कम देणे लागु नये याकरीता नि. २५ वरील म्हणण्यामध्ये अर्जदार यांची सर्व कथने नाकारल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अर्जदार व त्यांची मुलगी यांना त्यांचे उदरनिर्वाहसाठी वि.प.क्र.१ यांचेकडुन पोटगी मिळणे क्रमप्राप्त असल्याचे दिसुन येते. असे करत असतांना वि.प.क्र.१ यांचे उत्पन्नाबाबतची नेमकी स्थिती ही पुराव्याअंती निश्चित होणार आहे. तसेच वि.प.क्र.१ यांच्यावर देखील त्यांच्या आई-वडील म्हणजेच वि.प.क्र.२ व ३ यांचे पालनपोषण व औषधपाणी, इत्यादींची जबाबदारी असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे अर्जदार यांचा मुळ अर्ज निकाली होण्यास विलंब होवु शकतो. अर्जदार व तिच्या मुलीच्या पालनपोषणाची जबाबदारी वि.प.क्र.१ ची आहे. त्यामुळे अर्जदार व लहान मुलगी यांच्या गरजा लक्षात घेता, तसेच सध्या जिवनावश्यक वस्तुंच्या किमती लक्षात घेता व वि.प.क्र.१ चे उत्पन्न लक्षात घेता अर्जदार हिचा अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. वरील कारणमिमांसेच्या आधारावर मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. वि.प.क्र.१ हयाने अर्जदार हिला आणि अर्जदार व वि.प.क्र. १ यांची मुलगी स्पृहा यांना अंतरिम पोटगीपोटी दरमहा ₹ ६,०००/- फक्त त्यांचे करिता अर्ज दाखल तारखेपासून पुढील आदेश होईपर्यंत दयावे.

२. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य देण्यात यावी. तसेच एक प्रत संबंधीत पोलीस स्टेशन व सेवा पुरवठा करणारे यांना पाठविण्यात यावी.

KULKARNI GAJANAN AJAY
Digitally signed by KULKARNI GAJANAN AJAY
Date: 2024.04.01 15:20:53 +0530

दिनांकः- ०१.०४.२०२४

(जी.ए. कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र. ५) दौंड,
ता. दौंड, जि. पुणे